दिल से



प्रा. प्रियानंद आगळे
अध्यक्ष : इको-निड्स फाऊंडेशन

# पर्यावरण चळवळीत आपणही सहभागी व्हा!

इको-निड्समार्फत आम्ही ग्रामीण भागात पाणलोटक्षेत्र विकास, आरोग्य शिक्षण या विषयांवर काम सुरू केले. त्यामुळे माझ्या गावाशी व ग्रामीण भागाच्या पुन्हा संपर्कात आलो. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या कन्सल्टन्सीचे तीन जिल्ह्याचे काम संस्थेकडे आले म्हणून या योजनेचा अभ्यास केला. यात हजारो किमी लांबीचे रस्ते बनवले जाणार होते. त्यामुळे हजारो झाडांची कत्तल होणार होती. मात्र या योजनेत नवीन झाडे लावण्याचा कोणताही प्रस्ताव नव्हता. त्यासाठी आम्ही 'रोड बनाओ पर पेड लगाओ अभियान' हाती घेतले. या अभियानामार्फत रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडे लावण्यासाठी राष्ट्रपतींना निवेदन दिले. जिल्हा परिषद, महानगरपालिका रस्ते विकास मंडळ या विभागांनाही अभियानाची माहिती दिली. या अभियांनात जनजागृती होऊन पर्यावरणरक्षणासाठी युवकांनी पुढाकार घेतला.

माजी खासदार सुरेश प्रभू यांनी नद्याजोड प्रकल्प सुरू केला होता. त्याचा अभ्यास केला. यातून असे समजले की, पाण्याच्या प्रश्नासाठी कावेरी नदीवरून मोठे राजकारण होत आहे, हे देशाच्या दृष्टीने घातक आहे. म्हणून पुढच्या काळात 'पाणी और देश बचाओ अभियान' सुरू केले. आता अंतराष्ट्रीय परिषदांमध्ये माझे संशोधन ग्राह्य धरले जात आहे. जगाची प्रदूषण ही एकमेव समस्या असल्याची माझी धारणा झाली होती. पर्यावरणाच्या आमच्या कामात सर्वांना सहभागी करून घेण्यासाठी पर्यावरणाची चळवळ सुरू करण्याचे ठरवले. या चळवळीला 'इको-रिव्हॉल्युशन' असे नाव दिले. पी. एस. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या १००-१५० एकर परिसरात तुरळक झाडे होती. आम्ही हा परिसर हरित करण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाची आवड निर्माण करण्यासाठी सुमीत, तोसिफ, प्रियंका, नीलेश यासारख्या विद्यार्थ्यांना एकत्र करून 'नागसेनवन बनाओ अभियान' हाती घेतले. या परिसरात जागोजागी झाडे लावून वाढवण्याचे काम सुरू केले.

व्हीजेटीआय अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई या ठिकाणी प्राध्यापकाची नोकरी मिळाली. आमचे संचालक डॉ. नारायण खेडकर हे अतिशय चांगले व्यक्तिमत्त्व असून विधायक उपक्रमांना त्यांनी नेहमीच प्रोत्साहन दिले. माझी निवड करताना त्यांनी माझ्या कामाची प्रशंसा केली. हे काम करण्यास व्हीजेटीआय संस्था तुम्हाला सर्वतोपरी मदत करील, असे आश्वासन त्यांनी दिले. या आश्वासनाच्या जोरावर मी औरंगाबाद सोडून मुंबईला आलो. इथेही डॉ. नीलेश वानखेडे व इंजिनीअर नरेंद्र तेजाळे यांच्यामार्फत मोठा लोकसंग्रह केला. कोकणातील पर्यावरण संवर्धनासाठी दादर ते किंग सर्कल अशा मानवी साखळीचे २००९मध्ये आयोजन केले.

आता संस्थेचे काही सहकारी अमेरिकेत स्थायिक झाले आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी ते काम करत आहेत. माझा भाऊ अत्तःदीप वकिलीचे शिक्षण घेऊन तो गरीब लोकांना कायदेविषयक संस्थेमार्फत मोफत मदत करत होता. याशिवाय गरीब विद्यार्थ्यांना सरकारी कार्यालयातील कामांची माहिती सामाजिक सेलमार्फत दिली जात होती. त्यातच आयएस अधिकारी संस्थेशी जोडले जात होते. डॉ. नीलेश वानेखेडे यांनी संशोधन क्षेत्रात काम करणारी मंडळी संस्थेला जोडण्यास सुरुवात केली होती. त्यानंतर नरेंद्र तेजाळेसारख्या अधिकाऱ्यानेही सरकारी अधिकाऱ्यांना आमच्या चळवळीत सामील करून घेण्यास सुरुवात केली होती. अशा प्रकारे छोट्या स्वरूपात सुरू झालेली ही चळवळ विस्तीर्ण बनली.